**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – नामदेव मारुती सावंत.

**वय** – २८ वर्ष, **व्यवसाय** – शेती,

**राहणार–** पेरणोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

१. माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. आरोपी माझ्या गावातील असल्यामुळे मी त्याला ओळखतो. मी दि.२८.१०.२०२३ रोजी पोलिसांसोबत कोठेही गेलो नव्हतो. मी गावातील उदय सावंतला ओळखतो. तो आता हयात नाही. पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून दारुच्या बाटल्या जप्त केल्या नव्हत्या. त्यांनी माझ्या काही कागदावरती स्वाक्ष–या घेतल्या होत्या. आता मला माझी स्वाक्षरी असलेला पंचनामा दाखवला, मला त्यातील मजकूरा बाबत माहित नाही.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन त्यास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.१०.२०२३ रोजी मी व दुसरा पंच उदय सावंत आजरा पोलिसांसोबत पेरणोली–वझरे रस्त्यावरील बांबर नावाच्या शेताजवळ पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला तेथे आरोपी हिरव्या पांढ–या रंगाची पिशवी घेऊन संशयास्पदरित्या आढळून आला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी आमच्या समक्ष त्याच्या ताब्यातील पिशवीची झडती घेतली असता, त्यामध्ये देशी दारु व्हाईट डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या २० सिलबंद बाटल्या मिळाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी त्यातील एक बाटली रासायनिक तपासणीसाठी सिलबंद करुन त्याचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – श्री. बी. एस. जाधव वकील.**

३.  उलट तपास नाकारला.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ११.०४.२०२६.                    **(आर. पी. थोरे)**

आजरा.                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA